# नी हा र

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १२५६

पद्मा

REFBK-0008341
REFBK-0008341

किंमत दोन रुपये


बहार

# नी हा र

REFBK-0008341
REFBK-0008341

पद्मा

किंमत दोन रुपये

मौज प्रकाशन : १५

आवृत्ति पहिली : ७५० प्रती
७ ऑक्टोबर, १९५४

पहिल्या आवृत्तीखेरीज
इतर सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन

वेष्टन : दीनानाथ दलाल

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिन्टिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
**वा. पु. भागवत**
मौज प्रकाशन लि.
खटाववाडी, मुंबई ४

# आई झाल्यावर

आतां कळतो ग आई !   अर्थ तुझ्या वेदनांचा
आणि हळव्या सुखांचा   दुःखांचाही.

आई ! आतां दिसतो ग,   तुझ्या प्रेमळ नेत्रींचा
खेळ ऊनपावसाचा   हळूवार.

जागे झाले ग श्रवण   मूक हुंदके ऐकाया ;
अर्थ त्यांचा आकळाया   मन माझें.

आतां पाहतें जगांत   तुझ्या वत्सल दृष्टीनं
वाटे सौंदर्यनिधान   बाळ माझा.

मोजितें मी सुखदुःख   तुझ्या मायेनें अनंत
आतां बाळाच्या सुखांत   सुख माझें.

आतां तुझें वेडें मन   भाग्यें मलाहि लाभलें
आणि पूर्णत्व पावलें   जीवन हें.

हृदीं बाळाला धरितां   आतां गहिंवरे मन
वाटे पुन्हा बाळपण   यावें मज.

अनुक्रम
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
389

# असूं दे ग शेजीबाई

असूं दे ग शेजीबाई,   माझा राजस सांवळा
गोकुळींचा ब्रह्मानंद   कृष्ण नव्हे का सांवळा ?

असूं दे ग शेजीबाई,   माझा लाल खोडकर
गडे, तुझें मोठें घर   जुना आपुला शेजार

नको गडे शेजीबाई,   सांगूं गाऱ्हाणीं बाळाचीं
तुझी माझी माया मोठी   बाळबुद्धि लाडक्याची

नको गडे शेजीबाई,   पाहूं डोळे वटारून
बाळ प्राजक्ताचें फूल   जाईल ना कोमेजून !

नको गडे शेजीबाई,   नको तोडूनियां बोलूं
थोराची तूं लेकसून   प्रेम नको असें तोलूं

बाळाच्या ग पायगुणें   फुलो वंशवेल तुझी
बाळासंगें येवो घरीं   ओळखाया माया माझी

## नाहीं जायचें अशानें

निघालास परगांवीं
बावरलें माझें मन
आज सकाळपासून

आवरीतें वस्तू तुझ्या
परी मन नारवतें
गोड पसारा मांडतें

तुझा कंगवा ये हातीं
फिरवितें केसांतून
आणि जातें थरारून

तुझ्या खमीसाच्या घड्या
ठेवतांना पेटीमध्यें
भाल त्यावरी टेकतें

नको बाई !—उमटेल
माझ्या कुंकवाची खूण
मित्र घेतील बोलून !

बघूं काय पुस्तकांत ?
तुझें माझें छायाचित्र !
मज हासतोस मात्र !

नको तेथें बसूनीयां
पाहूं रोखल्या दृष्टीनें !
नाहीं जायचें अशानें !

# अनुभविसी का कधीं

सांग कधीं निजस्मृतींत मज तूं पाहसि का मोहना ?
अनुभविसी का कधीं माझिया प्रीतीच्या यातना ?

सुखीं विलासीं रमतां दिससी तूं निज सुहृदांसवें
एकांतीं परि माझ्या स्मृतिनें गाळिसि का आसवें ?
सांत्वन करिते भग्न मनाचें एकच ही कल्पना

तुझें नि माझें मीलन आतां अशक्य या जीवनीं
दोष कुणाचा कळे न, मज परि झुरणें मनिंचें मनीं
आणि खुळी मी समजें असतिल याच तुझ्या भावना

कधीं चांदणें शुभ्र पडे अन् हसे मत्त मोगरा
खुषींत जातां खुडावया सुम स्मरे तुझा चेहरा
आणि अकस्मात् धार सुरीची येइ सुखाच्या क्षणा

व्याकुळतें अन् भितें अंतरीं प्रश्न कराया तुला
विसरुनियां गेलास काय रे, सुखसंसारीं मला ?
नकोच उत्तर ! प्यारी मजला ही माझी वंचना

सुखी असावें तुवां नित्य ही आस जरी अंतरीं
परी माझिया स्मृतिनें व्हावें दुःखित तूं क्षणभरी
तींत सफलता गमे—जीवना तीच एक प्रेरणा

अनुभविसी का कधीं माझिया प्रीतीच्या यातना ?

# भाद्रपदांतील विनोदी पाऊस

भाद्रपदांतील विनोदी पाऊस,
खट्याळ वारा,
स्वप्नांत रंगल्या संध्याराणीच्या
हळूच ओढिती लाल पदरा.
आणि बूचतरू सुगंधी पेल्यांत
घेऊन सर्बत म्हणतो लाजत,
"ऊठ ना राणी ! पहा ना जरा..."

# नको विचारूं अर्थ

असाच केव्हां केव्हां येतो
उगिच साजणी, भरून ऊर ;
अशीच केव्हां केव्हां खिळते
नजर साजणी, उगीच दूर ;
अशीच खुलते संध्या केव्हां
बदलित मनचा नाजुक नूर ;
रात आणिते उगीच केव्हां
नयनिं चांदणें तलम टिपूर ;

असेंच केव्हां नाचे पाउल
थय्थय्—तुटलें जरि नूपूर ;
उगीच गातें बीन जोगिया
सुरांत मिळवित हळवा सूर ;

असेच अश्रू, अशीच फडफड,
असेंच उठतें हें काहूर ;
उगिच उसासत, सुगंध उधळित
पेटत राही मनिं कापूर ;

अशीच केव्हां फिरवुनि आणी
स्वप्न-मळ्यांतुनि ही हुरहूर ;
हिच्याच संगें जीव तरंगे
—कापुस सावरिचा भुरभूर ;
अशीच वेडी शोधित फिरते
कांहिंतरी जें दूरच दूर ;
नको विचारूं अर्थ, साजणी,
उगीच नयनीं आणित पूर

# रहदारीच्या पथापलिकडे

रहदारीच्या पथापलिकडे गर्विष्ठा, तव घर
छाती काढुन बसे जणूं कीं भव्य शुभ्र कबुतर

उंच मनोरा निळ्या नभाशीं करि कसलें हितगुज
दीप विजेचे निळे,—तयांची व्याधाशीं कुजबुज;

लाल कुसुंबी भडक फुलांची वेल चढतसे वरी
सुवर्णचंपक तिला खुणावी धुंद होउनी उरीं

निळें चांदणें आवाजाविण लकेर घे उत्सुक
चिरूट उंची वलयें सोडी हवेमधें नाजुक

शाल काश्मिरी लपेटुनी तूं सौधावरतीं उभा
जहांगीर जणुं तुला शोभते अहंपणाची प्रभा

रहदारीच्या रस्त्यावरुनी जातां मी कधिं कधीं
कांटा खुपतो, जरी दरवळे गुलाब हृदयामधीं!

# माझा सुधीर

माझा सुधीर सांवळा   हिणविते जन-वाचा
आणि दाखविती मज   कोणी दिमाख कशाचा

नील नितळ आकाश   शुभ्र रंगही हंसाचा
तुझ्या अंगकांतीपुढें   काय दिमाख तयांचा ?

अत्तराचा परिमल   आणि सुगंध फुलांचा
तुझ्या केशगंधापुढें   काय दिमाख तयांचा ?

पांखरांचीं मऊ पिसें   स्पर्श मृदुल सशाचा
तुझ्या जावळापुढतीं   काय दिमाख तयांचा ?

छटा पूर्वेची आरुणी   तसा रंग गुलाबांचा
तुझ्या कपोलापुढतीं   काय दिमाख तयांचा ?

डोळे काळे हरिणाचे   डौल कमल-दलांचा
तुझ्या नयनांपुढतीं   काय दिमाख तयांचा ?

चांदण्यांचा रे, आल्हाद   सडा हिऱ्यामाणकांचा
तुझ्या मुक्त हास्यापुढें   काय दिमाख तयांचा ?

साखरेची मधुरता   मोह साखरझोंपेचा
तुझ्या गोड पाप्यापुढें   काय दिमाख तयांचा ?

# अभिलाषेच्या पोटीं

अभिलाषेच्या पोटीं संतत
उपभोगाचा निघे कोळसा
मिळे तयांतुनि एखाद्या क्षणिं
हिरा प्रीतिचा लाखमोलसा

त्याच क्षणाच्या तेजावरतीं
जीवन कंठी अमुचें स्त्रीपण
नातरि दिसल्या असत्या जगतीं
विश्वयोषिता घराघरांतुन.

# अशीच यावी रात्र चांदणी

अशीच यावी रात्र चांदणी
 सुखवित दुखवित मनास माझ्या
असाच यावा सुगंध जुइचा
 मनच्या जखमा करीत ताज्या

तुझ्या दिशेचा वारा यावा
 जखमांवर त्या घालित फुंकर
मधुर वेदनेंतुनी आंसवें
 निखळावीं रे, अशींच सुंदर !

# याच कांहीं क्षणांसाठीं

भिंती फिकट हिरव्या   झुले पडदा रंगीत
आणि कोचांच्या गिरद्या   हिर्व्या गडद गडद

शुभ्र पुतळा बुद्धाचा   पुष्पहारें सुशोभित
उद्बत्तीच्या सुवासानें   मन होतें उल्हसित

उभे समोर गांधीजी   धीर देत मानसासी
रोमां रोलां नि लेनिन   नव्या युगाचे हे ऋषि

पलिकडे तीं कपाटें   ज्ञान-रत्न-मंजूषांचीं
वरी विराजे प्रतिमा   ध्यानमग्न ज्ञानेशाची

उजळतो कोन कोन   प्रकाशानें निळसर
तूं मी वाचीत बैसतों   स्तब्धपणें कोचावर

कधीं वाचतांना येई   कांहीं विशेष सुंदर
सांगतांना एकमेकां   येतो आनंदा बहर

खिडकीशीं जातों कधीं   दोघें पुस्तकें मिटून
न्याहाळतों मूकपणें   आकाशींचें तारांगण

येई झुळूक वाऱ्याची   सवें सुगंध घेऊन
हालवीत तुझे केस   रुंद कपाळावरून

स्तब्ध निःशब्द भोवतीं   तसें तुझ्या माझ्या मनीं
मूकताहि वाटे गोड   लाख प्रेमबोलाहूनी

वेगें दिवस संपतो   आपुलाल्या उद्योगांत
याच कांहीं क्षणांसाठीं   आतुरतें माझें चित्त !

# विडा

राया! रंगला रे विडा
आणि नाहींस तूं येथें
गोड तुझी आठवण
हृदयांत दर्वळते

झालें एक तप—होते
ओठ विड्यानें रंगले
तुझे खोडकर डोळे
माझ्या मुखीं स्थिर झाले

म्हणालास हासूनियां:
"राणी! विडा ग रंगला!"
ओळखूनी भाव तुझा
पळ तेथून काढिला!

तूंहि धावलास मागें
दारीं उभ्या सासूबाई
खरें लपवावयाची
कोण उडे तुझी घाई!

हासूं दाबीत ओठांत
डोळे मोठाले करून
जातां सासूबाई—मींच
मागें पाहिलें वळून

चार डोळयांच्या मीलनीं
राया! रंगला रे विडा!
आज आठवणीनें त्या
मनीं दर्वळे केवडा!

# माझ्या पाठच्या बहिणी

अनुक्रम
क्रमांक
नों. दि.

माझ्या पाठच्या बहिणी !   तुझ्या संगतीं सोबतीं
आठवणी पालवती   शैशवाच्या.

तुझ्या संगतीं सोबतीं   मज माहेर भेटलें-
आणि मनांत दाटलें   कांहीं तरी.

गडे, आलीस पाहुणी   ग्रीष्मीं झुळूक वाऱ्याची
आसावल्या मानसाची   तृप्ति झाली.

बाळपणींची ममता   आंबा पाडाचा मधुर
अजूनहि जिव्हेवर   रुचि त्याची.

तुझें माझें घरकुल   उभें अजून माहेरीं
जणुं पऱ्यांची नगरी   शोभिवंत.

आज भिन्न तुझें गांव   भिन्न तुझें माझें नांव
परि हृदयींचा भाव   तोच राही.

तुझे दाट मऊ केस   विंचरले माझे हातीं
सुवासिक त्यांची स्मृति   अजूनहि.

तुझ्या संगतीं सोबतीं   भांडलेंहि कितीकदां
वाढे भांडून ममता   पटे आज.

चार दिवस बोललों   आठवणी उजळीत
चिंचा-आंवळे चाखीत   शैशवींचे.

चार दिवस हिंडलों   वेष सारखा करूनी
पुन्हा कुणींहि बहिणी   ओळखाव्या.

चार दिस विसरलों   तूं, मी माता नि गृहिणी
विनोदानें हूडपणीं   बोलतांना.

तुझी माझी ग, ममता   गोड वेळ पहाटेची
मना तजेला द्यायची   निरंतर.

घरीं निघाली पाहुणी   टाळतें मी तुझी दृष्टि
वाटे, अवेळींच वृष्टि   होईल कीं !

# ये अवचित नवजीवन

आज मला ये अवचित नवजीवन
प्रीति मनीं ये बहरुन चिरसुंदर चिरनवीन

पुष्पपरिमलासमान
मदगंधित देहांतुन
गीत गात श्वासांतुन स्पर्शित ये भासांतुन

अलकांतुन, पुलकांतुन
अधरांतुन, रुधिरांतुन
रुमझुमती, थयथयती हे मंजुळ रतिपैंजण

ये उकळीवर उकळी
मनगात्रें रसरसलीं
खळखळतें हृदयांतुन हें अमृत, हें यौवन

येइ प्रीति निरभिलाष
दाहकतेविण प्रकाश
उत्सुक मन मीलनास मीलन—सर्वस्वदान !

# सखे, तुझें पत्र आलें

सखे, तुझें पत्र आलें   सवें घेऊन श्रावण
पावसाच्या सरीसंगें   कांचनाचें कोळें ऊन

तुझें पत्र बांधी मनीं   सुखदुःखांचे हिंदोळे
स्मृती-संगतीं मानस   रमे, हेलावे, आंदोळे

पत्र-भेटीनें गाऊं या   पंचमीचीं गोड गाणीं
हिर्वळीच्या नाना छटा   आळवुनी रंगवुनी

संसाराच्या फेरामध्यें   नको यावया भोवळ
खेळूं क्षण, पुसूनियां   गालांवरचे ओघळ

नाग पुजूं—करूनियां   माहेराची आठवण
फुलें, लाह्या उधळूं या   दुःख सुखीं फुलवून

घालूं उखाणे प्रीतीचे   धुंद होऊं फुगडींत
सुवर्णाचे कण वेंचूं   इथें, तिथें जीवनांत

तुझी माझी पत्रभेट   ठरो श्रावणसौभाग्य
शांत होवो चैत्रांतली   हृदयींची तगमग

# मध्यरात्रीं

कोण जाणे कशानेंशी  मध्यरात्रीं जाग आली
दुष्ट स्वप्नें कसलींशीं  झोप घेउनियां गेलीं

हळू आलें सौधावर  देखियेलें भोंवतालीं
मखमाली अंधारांत  सृष्टिसखी विसावली

विर्घळले सारे जीव  जणूं अद्भुत शांतींत
विरामले मनोभाव  मध्यरात्रींच्या कांतींत

आषाढींच्या मेघांआड  साऱ्या चांदण्या लोपल्या
क्षितिजाच्या मांडीवरी  चारी दिशाहि झोपल्या

थांबलीसे तगमग  जीर्णशीर्ण बकुळाची
बसे पिंपळ ध्यानस्थ  जणूं वीतराग ऋषि

जाईजुईची लाजरी  बंद झाली कुजबूज
अधांतरीं थांबे वारा  नेत्रीं ओथंबून नीज

एकलाच दीप जळे  मार्ग उजळीत शांत
जळण्याचें दुःख जळे  दिव्य प्रकाश-दानांत

आणि सृष्टि झाली कान  ऐके संदेश प्रभूचा
लय लागे प्रभुपदीं  मूक झाल्या साऱ्या वाचा

पिउनी तो शांतिरस  नातें जडलें सृष्टीशीं
दूर पळालीं दुःस्वप्नें  थांबली ती कासाविशी

# संध्याकाळ उलटली

संध्याकाळ उलटली   दिशा घालिती काजळ
नव्हती ग तेजाळली   गगनींची दीपमाळ

तरू उभे स्तब्ध, पोटीं   धरूनियां पक्षीबाळें
अंधाराच्या चाहुलीनें   जीव त्यांचे बावरले

सांजआरती चालली   दूर कुठें देउळांत
बाई ! कातरवेळेची   कातरता वाढवीत

वाटे, भिंतीवर पडे   उभी कुणाची साऊली
मन गेलें ग, भिऊन   फिरे मागल्या पाउलीं

उभें राहण्याची ऐट   तेंच धारदार नाक
तेंच केसांचें वळण   सुटाबुटाचा तो झोक

यावा यावा वाटे रोज   तोच आला का प्रवासी ?
परी येईल तो कसा   अशा कातरवेळेसी ?

कुंद धुंद अवेळेला   कोण आला मुसाफीर ?
चुकचुके पाल कोठें   मनीं माजलें काहूर !

लाविली मीं सांजवात   उरीं रोधुनियां श्वास
बळें दृष्टिआड केला   नित्य ध्यासांतला भास !

# रे, तूं फसवा !

रे, तूं फसवा !
पाण्यावरचा फेसच नुसता
इंद्रधनूचा भासच नुसता !

भुलविलेंस तूं बोलुन केवळ
लाडिक लवचिक !
दोन अर्थ वा निघतिल ज्यांतुन
हजार आणिक !

बिनवासाचें, बिनकांट्यांचें
फिकटच कांहीं—
बोललास तुज आज जयाची
स्मृतीहि नाहीं !

परि माझ्या उत्सुक हृदयानें
त्यास झेलिलें
निज श्वासानें गंधित केलें
रंग निर्मिले
स्पर्शानें कांटेहि उभविले
अलगद खुडुनी
जासि तूं, नि मी—
कवळुनि व्यर्थच कांट्यांना उरीं
होतसें श्रमी, होतसें श्रमी !

रे, तूं फसवा !

# स्वप्नांत आज मी वावरतें

स्वप्नांत आज मी वावरतें
क्षण हसतें, रडतें, व्याकुळतें

कसलें ग हें सुखसंवेदन ?
कसलें दाहक दारुण मोहन ?
सुखदु:खाचें कीं संमेलन ?
हें जीवन कीं स्वप्नच नुसतें !

संकल्पांना पंख फुटति नव
आशांच्या हृदयीं गुंजारव
पाझरती मनिं अमृत-आठव
नयनांत नीर तरि साकळतें !

गंध सेवुनी धुंद मृगापरि
धुंडित फिरतें वनीं कस्तुरी
मीच सुरभिनी जाणिव हो तरि
शरविद्ध मृगापरि तळमळतें !

देह पिसापरि हो हलका फुल
फुलापरी उरिं दाटे परिमल
परिमलांत ये ज्योत्स्ना शीतल
तरि चांदण्यांत या मी जळतें !

कां असली ही अथांग तळमळ ?
अधरीं हासूं नयनदलीं जळ
कळेंत ये कीं कळाच झुळझुळ
मरणांतुनि जीवन कीं गातें ?

# शुक्रतारा

स्वप्नमंचकावरी पहुडलें होतें मी निळसर
शशिकिरणांच्या मच्छरदाणिस वेलींची झालर

पारिजात-निशिगंध-गंधमय दुशाल अंगावर
तरुशाखांचा घेउनि पंखा मलयानिल तत्पर

आणि उशाला तेवत होता शांत चंद्रदीपक
वाचित होतें नक्षत्रांचें भावमधुर पुस्तक

सप्तर्षींना सांगत होती अरुंधती नवकथा
चित्रा, स्वाती मूक बैसल्या लपवुन विरहव्यथा

मृगावरी शरवेध घेउनी व्याध उभा सर्वदा
बघति विस्मयें दिशा ध्रुवाच्या सुंदर अक्षय-पदां

शनि-मंगळ जणुं राजकारणीं भेटति नभसागरीं
स्वर्गधरेच्या तहनाम्याची सनद लिहिति निजकरीं

अन् शुक्राचा प्रेमळ तारा दिसतां मम लोचन
आले भरुनी, अडखळले, मग थांबलेंच वाचन

शुक्रामधुनी एक निघालें वदनकमल हासत
प्रेमकटाक्षें परागपरिमळ मजवरतीं उधळित

स्पर्शाविण मज कुरवाळित अन् शब्दाविण बोलत
निशेउषेचीं कोमल स्वप्नें उलगडुनी दावित

मोहरुनी मम प्राण हासले, ओलवले गाल
गहिवरलें नभ, दहिरवलें जग, विरघळला काल !

# शेजारी

कांहीं सांगायासारखें  राहिलेंच नाहीं आतां
तसें कांहीं ऐकायची  उरली न उत्सुकता

कालप्रवाहानें केलें  तुला आमुचा शेजारी
तुझ्या प्राजक्ताचा सडा  पडला रे, माझ्या दारीं

वेचितां मीं फुलें कांहीं  तूंही दिलीं माझे हातीं
औपचारिक रीतीचे  शब्द दोन आले ओठीं

रोज प्राजक्ताचा सडा  वरी पायांची रांगोळी
फुलांची हो देवघेव  दोन शब्दांचीच बोली

अस्पष्ट त्या भावगंधें  सुगंधित झाले दिन
दूर झालों अवचित  कालप्रवाहें आपण

नव्हे भावना ती प्रीति  कळलेंच नाहीं खरें !
तिच्या माधुरीस परी  उणे अमृताचे झरे !

दुःख करायासारखें  सांग आतां काय आहे ?
गोड स्मृतींचा निर्झर  पहा झुळुझुळू वाहे !

## मी वेडी

मी वेडी, मी वेडी
सुटतिं न मज हीं कोडीं
जीवाचीं, भावाचीं
हीं हळवीं, हीं निष्ठुर
हीं रडवीं, हीं सुंदर
उलगडतां हळु हातें
अधिकच हीं गुंततात
सुरगांठी, निरगांठी
दोंहि जिवा काचतात
टाकूं का या तोडुन ?
राहिन का त्यांवांचुन
क्षणभर तरि मी जिवंत ?
—अन् तुटतां हे धागे
जरतारी झगमगते
रेशमि मउ झुळझुळते
मी पडेन कोसळून
उन्मळल्या वेलीपरि !
अन् तुटतां हे धागे
मी सुटेन बंधांतुन
अन् पुनरपि मुक्तीच्या
वेडांतच–वेडांतच—
निर्मिन कोडीं नवीन !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 6509

कोड्यांतच या गुंगुन
धाग्यांतच या गुंतुन
कोळयाच्या जाळयांतिल
तडफडत्या माशीपरि
मज जगणें!—कारण कीं
मी वेडी!—मी वेडी!!

# नकळत

नकळत कांहीं   असेंच घडतें
वृत्ति आकसते   ठायीं ठायीं

मावळतें हासूं   ओघळती आसूं
जणूं खाष्ट सासू   बोले कोणी

लाडावली लेक   तशी ही भावना
हिच्या लहरींना   जपूं किती ?

हासेना बोलेना   उमलेना कळी
तऱ्हाच वेगळी   जगाहून

सासर-माहेर   पर्वा ही करीना
हिचा एक बाणा   जनीं मनीं

ह्रिच्यापायीं किती   सोसावा मीं छळ ?
आंतड्याची कळ   हिला काय ?

मात्र जेव्हां देतें   तुझी आठवण
सहस्रमुखानें   हासते ही !

# माहेरास जावयाचें

माहेरास जावयाचें   वेध आतांच लागले
आणि आठवे सहज   कांहीं पुढलें-मागलें :

गर्द हिर्वा चुडा हातीं   पहिली माहेराची खेप
जाईजुईच्या संगतीं   रातीं अवघडे झोप

आणि उठतां सकाळीं ?   आतां कसें आठवेल ?
नणंदा-जावांची मस्करी   तुम्हां थोडी कुस्करील ?

सुटे गाडी—दाबलात   हात, दाखवीत बळ
साऱ्या अंगभर त्याची   झिणझिणे गोड कळ

रोज निळ्या पाकिटांत   वाळा गुलाब दवॅळे
दादावहिनींनीं मज   पुरेपुरेसें हो केलें !

आतां सत्राची ही बेबी   तिची धरायची चोरी
हवा पोक्तपणा जरा   रीत तुमची हो न्यारी.

हो ! हो ! जायलाच हवें   माझ्या भाचीचें लगीन
नाहीं—शपथ; सांगतें !   आठ दिवसांनीं येईन.

तुम्हां पुरुषांचें बाई,   सारें सारें विलक्षण
मी ना ! नाचतेंच आहें   माहेराच्या आनंदानें.

येतें,—जपा प्रकृतीस   दिस पाऊसपाण्याचे
कुठें काय ? गेले वाटे   डोळां कण कोळशाचे !

# कधीं कधीं

कधीं कधीं होऊनि उर्वशी
शृंगारानें तुज भुलवावें
कधीं तपस्या तुझी होउनी
भवमोहांतुनि तुज काढावें

कधीं कधीं होऊनि राधिका
तुझ्या बन्सिनें वेडें व्हावें
कधीं रुक्मिणी होउन पत्रीं
प्रेमें तुज आवाहन द्यावें

कधीं कधीं सति होउन यज्ञीं
उमास्वरूपें तुजसि वरावें
सावित्री कधिं बनुनि तुझ्यास्तव
काळाशींही हसत लढावें

परी कधीं हे पुरुषा ! अदया !
रामस्वरूपीं तुला बघावें
भूमिगता सीताच होउनी
एकाकीपणिं तुज रडवावें

# आम्ही कुलीनांच्या कन्या

आम्ही कुलीनांच्या कन्या   चांफेकळ्या पानांआड
मुलीं मांडूं ना आरास   मुग्धपणें लावूं वेड !

आम्ही कुलवती कन्या   वाद फुकाचा ना घालूं
शब्द चतुर मोजके   हिरे-माणकांशीं तोलूं

आम्ही कुलशीलवती   नाहीं बोलणार प्रीत
कुलीनांच्या डोळ्यांनाच   समजेल गूढ हेत !

डोळा कराल वाकडा   कडाडेल वीज जशी
सखी शृंगार-मंजिरी   लीलावती पतीपाशीं !

कर्ते घरचे गर्जती   आज्ञा देती रागें कोणा
वाजतांच कंकणें हीं   होई अटक शब्दांना !

पाऊल ना ओलांडील   व्यर्थ कधींच उंबरा
दरबारीं, देवडींत   पायरवाचा दरारा !

झालें विलीन आमुचें   व्यक्तिमत्व घराण्यांत
सुगंधानें व्यापी घर   उदबत्ती कीं जळत !

प्राणरक्षकता कधीं   उगा जाणवे हवेची ?
प्रसंगांत कुलकन्या   शिवशक्ति संसाराची !

# लक्ष्मणरेषा

तूंच एकदां म्हटलें होतें
प्रीत विसरणें अशक्य नाहीं.
प्रामाणिक तूं—विसरलासही !
मलाच पण तें जमलें नाहीं.

विसरलास तूं—अन् मी झालें
रे, केवळ गृहमंदिरभूषा ;
विसरुनि जाया तुला, मजपुढें
मींच ओढिली लक्ष्मणरेषा.

मादक दृष्टीमधिं रमणीच्या
बुडविलेस तूं माझे डोळे
शुक्र उगवतां निशींप्रभातीं
ओलवती पण अजुनी भोळे.

न बोलतां वा न पाहतांहि
मूकपणें जें वदलों आपण :
विसरलास तूं अमोल सारें,
मन्मनिं त्याची सदैव रुणझुण !

विसरलास तूं तें, तेव्हांचें
सहज, निरामय, मधुर, मोकळें ;
मलाच कां तें क्षणहि न साधे ?
रोज नव्यानें हृदय हें जळे.

पुन्हा एकदां—एकदांच ये
शिकव प्रीतितें जाया विसरुन,
ना तरि त्वन्मय होतां जीवन
लक्ष्मणरेषा मी ओलांडिन !

# स्वप्नमयी

तुझ्या नाजुक बांध्याला   राजहंसीची गोलाई
तुझ्या चरणचालींत   नागिणीची चपळाई

तुझ्या हसऱ्या डोळ्यांत   आकाशाची गे निळाई
काळ्या केसांत श्वासांत   दरवळे जाईजुई

तुझ्या मृदुल कांतीला   ताज्या दुधाची झिलई
तुझ्या केतकी स्पर्शांत   चांदण्याची शीतळाई

बोलण्यांत हासण्यांत   गोड धिटाई मिठाई
आणि सदाचीच तुला   पोरी! कसलीशी घाई

स्नेह-अमृतें भरली   दिव्य सुवर्ण-सुरई
बाळे! तूं ग निसर्गाची   मूर्तिमंत नवलाई

मज मोहवी सुखवी   तुझी गोड चतुराई
तुझ्या क्षणिक दर्शना   पणा लावीन पुण्याई

नको—लागेल ना दृष्ट   इडापिडा टळो बाई!
मनीं स्वप्नीं रहा सुखी   माझे कन्ये! स्वप्नमयी!

## पुनःप्रत्यय

आज पुन्हा अंगोपांगीं   सोनचांफा बहरला
पुन्हा बाई, श्वासोच्छ्वासीं   धुंद मोगरा फुलला

आज पुन्हा गुलाबाचे   कांटे हृदयीं रुतले
आसवांत हासण्यांत   गडे कपोल भिजले

विशी-षोडशीची माया   लहरली कायेवर
आज पुन्हा शिशिराला   आला वसंत-बहार

पुन्हा मानसांत कांहीं   मोहरलें दलीं दलीं
चिरप्रणयिनी त्यांत   मत्त गावया लागली

पुन्हा मोहाच्या फुलांनीं   भारावलें वन सारें
खुलीं झालीं भराभरा   स्वप्नमंदिरें गोपुरें

पोरी ! तुझिया गुपितें   साद घातली यौवना
विसरलें तूज जशी   विसरलें मी आपणा

सांग पुढें, मी ऐकतें   नको पाहूं रागावून
काय म्हणाला तो तुज   हनुवटीस स्पर्शून ?

काय तरी म्हणतेस ?   थट्टा नको, सांग खरें !
कुणी सांगितलीं तूज   आमुचीं हीं प्रश्नोत्तरें ?

# प्रेम नको वाटाया

प्रेम नको वाटाया
        जन्मठेप तुजसि सजा ;
तुजला मी प्रिय होतें
        एवढेंच सांगुनि जा

# वैरी

दर्शन तव क्षण व्हावें
झुरतें मनिं रात्रंदिन ;
बोल तुझे ऐकाया
क्षुधित नित्य होति श्रवण

दिसतां तूं पथिं केव्हां
जातें परि मुख वळवुन
अन् येतां तूं समोर
पळतें क्षण कर जोडुन

अपरिहार्य जरि वदणें
वदतें, "का ठीक काय ?"
घरिं येतां तळमळतें,
वैरी अभिमान हाय !

## होतें मी जगत मुर्दें

होतें मी जगत मुर्दें
शांत कृष्ण घन तमांत
तम जीवन, तमचि मरण
रंग दुजे मज न ज्ञात

लखलखली क्षण विद्युत
कणकणास पुंजाळत
जीवन जणुं इंद्रचाप
रंग रंग हो जिवंत

लखलखली क्षण विद्युत
व्हाया तिमिरांत लुप्त
रंगांचें वेड उरे,
शांतिही नुरे तमांत !

# तूं नव्हेस तो

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

तूं नव्हेस तो जो मी
कवितेंतुन वर्णियला
खिजविति तुज जन म्हणती
'बेइमान' रे मजला.

तो नव्हेस खासच तूं
—ठाउक हें तुज-मजला;
'रत्नहार' कुणि अपुला
उघड्यावर टाकियला ?

# एकटें बसाया

एकटें बसाया भय वाटतें
उरीं दाटतें
मनीं तुटतें
सहज डोळ्यांत पाणी सांठतें !

सांठल्या पाण्याच्या भिंगावरी त्या
बिंब उठतें
मज भेटतें
आणिक एकटेपण आटतें !

पाहून परके भाव परि ते
मागें हटतें
मन गोठतें
क्षणांत स्मृतींचें पोळें फुटतें !

ठिबकतो मध, मन चाखितें
मन माखितें
मनीं राखितें
सहस्र माशी ही जरी डंखिते !

आणि त्या मधाची—दंशाचीहि त्या
नशा चढते
नशा वाढते
आणिक बसावें वाटे एकटें ! सदा एकटें !

# ये अवखळ पोरीसमान

अवखळ पोरीसमान आज सकाळ
तोडीत गळ्यांतिल सोन्याची फुलमाळ
नादांत वाजवित रुमझुम अपुले चाळ
घरट्यांतुनि उडवी खगांस हीच खट्याळ

करिं आनंदाचें मोरपीस घेवोनी
गुदगुल्या करी मज गालावरि फिरवोनी ;
गुणगुणत स्वतांशीं वारा अधिरें गाणें
अन् फुगडी घाली घालित मजसि उखाणे

हें ऊन केशरी लोळण घेई अंकीं
लुसलुशित कोवळी निर्मळ बाळतनू कीं
तृणपर्णीं हसतें दंव मिचकावित डोळे
भिजवितें वसन मम लावुनियां कर ओले

तरुवेलींवरतीं फुलला सुमसंभार
लडिवाळ हास्य हें सकाळचें अनिवार
मैत्रीण हिची ती निळी टेकडी वेडी
मखमलिचा परकर आज ल्यावया काढी

घेऊन ओढणी जरतारी सुकुमार
मज खुणाविते, " ये बनुनी अवखळ पोर "
अन् मलाहि वाटे मुक्त सोडुनी केश
लेऊन परीसम हलका निळसर वेष

होऊन तरल या वाऱ्यासम धावावें
सोनेरी असल्या उन्हांत मिसळुनि जावें

गुदगुल्या कराव्या मूर्त बनुनि आनंद
गुणगुणत बसावें स्वतांशींच स्वच्छंद

सुमनापरि निर्मळ हसुनि जगा हसवावें
अन् विहंग बनुनी आकाशीं विहरावें
या लीन तृणाला दंव बनुनी नटवावें
अन् माझ्यांतुनि मी निसटुनि सकाळ व्हावें

## उगवला शुक्र

अजून पाहते कोणाची वाट ?
उगवला शुक्र झाली पहाट

अजून मंदिरीं केशरी ज्योत
रेंगाळे अधरीं अपुरें गीत
न्याहळती लाल लोचन दूरी
हारही कळ्यांचा तसाच करीं
तळमळे मनीं केवडा धुंद
पदर ढळतो जरीचा रुंद
बाई ग, भिजला काजळकांठ
उगवला शुक्र झाली पहाट

"थांबा ग, ऐका ना—तीच चाहूल
हिर्वळीवर का वाजे पाऊल ?
येईल अजून कोणत्या क्षणीं
जाईल लोहाचें स्वर्ण करोनी
पाहूं का हळूच गवाक्षांतून ?
नको ग ! निराशा घेईल प्राण
वाळल्या पानांची मस्करी धीट
उगवला शुक्र झाली पहाट

प्रवासी माझा का विसरे वाट ?
नव्हती मीं दिली शेल्याला गांठ
'येईन' स्वप्नांत वचन दिलें
म्हणून जीवनस्वप्न रंगलें
अर्पीन सर्वस्व तयाचे पायीं
उडाला हंस हा परतो बाई !

पुन्हा न व्हायची का कधीं भेट ?
उगवला शुक्र झाली पहाट."

पिवळा पडला चंद्र नभांत
खेळतो कळ्यांशीं पश्चिमवात
ओतीत आकाशीं माणिक-घट
आले ललकारीत उषेचे भाट
समजावा कोणी खुळीला जरा
'स्वप्नींचा' हंस का येईल घरा ?
घोकीते ही वेडी "तो नाहीं नट!"
उगवला शुक्र झाली पहाट

"नका ग चळवूं हिणवूं मज
जयाची मी तोच राखील लाज
येईल खास ती सोन्याची घडी
वाजेल हळूच दाराची कडी
दबेल मखमल पावलाखालीं
चोरून हासेल हाराची कळी
लाजून पळेल केशरी ज्योत
येईल रेशमी अंधार दाट
थांबेल शुक्र अन् वेडी पहाट
तोंवरी तयाची पाहीन वाट!"

# मी माणूस

सगळं खोटं सगळं खोटं
प्रेम खोटं काम खोटा
साऱ्या साऱ्या नकली नोटा
हसत हसत देत जायच्या
बिनतक्रार घेत राह्यच्या
सर्वांचीच एक गीम
देखाव्याचं सगळं स्तोम
परस्परांची फसवणूक
करून मानायची करमणूक
करमणुकीचं काय मोल ?
रंगित ओठ रंगित बोल !
आणिक अभ्रा जर का गोरा
चेक मिळेल अगदीं कोरा
पण सांभाळ ! तोही खोटा
जा वटवायला मिळेल सोटा !

स्त्री देवी हें तर खोटं
स्त्री सखी हेंही खोटं
स्त्री सुंदर चलनी हुंडी
स्त्री म्हणजे नुसती कुंडी
स्त्री म्हणजे केवळ मांस
शिकाऱ्याच्या हातांत फास
बाकी सारे मोहक भास
चीर फाड अन् तपास !
तरीहि चीड फुटत नाहीं
कुजकी भीड तुटत नाहीं

नटवी लाज सुटत नाहीं
हिशेब कांहीं मिटत नाहीं !
सगळं खरं मानीत नाच
प्रेतावरतीं आपुल्याच !

सगळं खोटं सगळं खोटं
असली ओरड तीहि खोटी
केवळ रंगभूमीसाठीं
खोटे अश्रू खोटी तडफड
खोट्याचीच तुला आवड
कां काढावा उगाच गळा ?
खोट्या वेणा ! खोट्या कळा !
यांतून निर्माण होइल काय ?
नुसती हाय ! नुसती हाय !
गाळांत रुतले खोल पाय
ओठावरची चाट साय !

सगळं खोटं सगळं खोटं
हेंही तुझं बोलणं खोटं
कोठें तरी लपलं अस्सल
खुशाल रक्ताचं दे मोल
खुशाल कर मोडतोड
नको भलती तडजोड
झगड आणि मार झोड
दूर सार सारी राड
खरं तेवढं शोधून काढ
लाव आपल्या शस्त्रा धार
झेल अंगावरतीं वार
त्याच कठोर वारांतून
त्या रक्ताच्या धारांतून

मिळेल अस्सल तें अन्मोल
उचल त्याला आणिक बोल—

नाहीं मी हो नुसती नार
पेजेसाठीं जी लाचार !
शेजेसाठीं आसुसणार !
नाहीं मी नुसती मादी !
मी माणूस—माणुस आधीं
माणूस म्हणून मी जगणार !
माणूस म्हणून झगडणार
माणूस म्हणून हसणार
अन् माणूस म्हणून मरणार !
माणसावरतीं माझं प्रेम
माणसासाठीं माझा काम
माणसासाठीं निर्मिन धाम !
मनुष्यांतुन निघेल स्त्री
तीच जगाची भाग्यश्री !

हेंच खरं ! हेंच खरं
तुला नि त्याला उद्धरणारं
तरच हा झगडा संपेल
खरं सुख त्यांतून उगवेल
फुलेल तुझं हृदयकमळ
उघडुनि अपुलं सहस्त्रदळ
मग तूं प्राणामधून हास
संसाराची खेळत रास
खुशाल डोल खुशाल नाच
गर्जत एकच, एकच घोष—
मी माणूस !—मी माणूस !

# झपाटलेलें झाड

मी झपाटलेलें झाड   मी जगास बनलों गूढ

राईंतच माझी वसती   पण ती तर नांवापुरती
हीं नातींगोतीं भवतीं   सांगायासाठिंच नुसतीं
अन् हरित पर्णसंपत्ति   सारखीच असती-नसती
स्पर्शांतिल जादू सरली
नजरेंतहि ओळख नुरली
रुचिहीना रसना उरली
मी स्थितप्रज्ञ जडमूढ   मी झपाटलेलें झाड

यौवनेंच किमया केली   बहरलीं अंगप्रत्यंगें
थरथरलीं कवळीं पानें   अन् मोहर तांबुस रंगे
अस्वस्थ मालती झाली   शांतता जुईची भंगे
मरतींत किती खेळविल्या
नजरेवर लतिका भोळ्या
कुणि हसल्या कोणी सुकल्या
मजला न कुणाची चाड   मी झपाटलेलें झाड

प्रणयाच्या भंवऱ्यामाजीं   सांपडली जाई भोळी
पुटपुटून लाजत कांहीं   ती कळयाकळयांतुन हसली
झिडकारित निज दर्पानें   मीं तिची मस्करी केली
" जर असेल मजवर प्रीती
ये, भेट वादळी रातीं
प्रीतीस कोठली भीती ? "
अन् खुळी हासली गोड   मी झपाटलेलें झाड

त्या रातीं सुटला वारा   कांपवीत दाहि दिशांस
माड ते घालिती पिंगा   पिंजारुनि अपुले केस

मुरगळून साऱ्या विश्वा   कुणि करी विकट उपहास
तों प्रफुल्ल जाई आली
कडकडून विळखा घाली
उन्मळून चरणीं पडली
प्रीतीच घेइ कीं सूड   अन् झपाटलें हें झाड !

दृढ मिठींत त्या शेवटच्या   मीं स्वर्ग पाहिले होते
घनदाट अमेच्या रातीं   चांदणें भोगिलें होतें
त्या धुंद सुगंधित जहरीं   अमृतहि चाखिलें होतें
हो क्षणांत सारें लुप्त
हें झाडच उरलें फक्त
मी संज्ञाहत अभिशप्त
मी बनलों केवळ दगड   मी झपाटलेलें झाड

मन असून उन्मनता ये   तनु असून निर्जिवताही
मी जगास परका झालों   मी मलाहि उरलों नाहीं !
अन् अतां पाहती कोणी   अवसेस इथें मुंजाही
तरुलता न ढुंकुन पाही
कोकिळा दुरूनच जाई
छायेंत पांथ ना येई
माझी न कुणाला ओढ   मी झपाटलेलें झाड

हीं अनंत मरणें मरुनी   राहिलों उभा मी येथें
तें सुप्त तेज हृदयींचें   या खोडांतच धगधगतें
शोधीत तया, कधिंकाळीं   येइल का प्रीतिच येथें ?
चेतवून तो स्फुल्लिंग
पेटवील हें अंगांग
मज करील मूर्त अनंग
लावून पेटती चूड   देईल मुक्तिची जोड !

# कसें समजावूं तुला ?

माझ्या भोळ्या खुळ्या जिवा !
रंग हिरवा सरला
उष्ण मातीचा केवळ
रंग करडा भरला !

माझ्या भोळ्या खुळ्या जिवा !
गंध मातीचा सरला
आतां उष्ण राख सारी
कसें समजावूं तुला ?

## आज बाहेरच जावें वाटेना

आज बाहेरच जावें वाटेना
सृष्टि या दृष्टींत मुळीं नटेना

बाहेर नारिंगी संध्या दाटली
झाडें नटलीं
रंगे वाटुली
कांहींच परी या मना पटे ना
आज बाहेरच जावें वाटेना

नदीच्या मनांत नभ झुळझुळे
नारिंगी निळें
छायेचें जाळें
त्यांतही जीव हा गुरफटेना
आज बाहेरच जावें वाटेना

निःशब्द कोणाची चाहूल लागे
हिंडते मागें
जोडीत धागे
रेशमाची अशी गाठ सुटेना
आज बाहेरच जावें वाटेना

घरांत भरला कुणाचा भास
उन्मत्त श्वास
मंद सुवास
ध्यासांतून धुंद मन उठेना
आज बाहेरच जावें वाटेना

इथें कुणाचासा गुंजतो शब्द
घालीत साद
लावितो नाद

छंदाची या मना लाज वाटेना
आज बाहेरच जावें वाटेना

आज या घराची माया ओढते
जिवा जडते
पाया वेढिते
अदृश्य आकुल मिठी सुटेना !

आज बाहेरच जावें वाटेना !

# अधरांच्या संपुटीं

अधरांच्या संपुटीं
क्षणच बहरतें
क्षण थरथरतें
मागें फिरतें, होउनियां हिंपुटी !

नयनदलीं कोमल
क्षणच चमकतें
क्षण भिरभिरतें
मागें फिरतें होउनियां व्याकुळ !

अंतरिंच्या अंतरीं
क्षणच उमलतें
क्षण परिमळतें
गळुनी पडतें, निर्माल्यच केवळ !

रे, माझ्या हितगुजा !
क्षणच जन्मुनी
क्षण परिमळुनी
क्षणिं मरणाची तुजला कायम सजा !

# ही हिरवी हिरवी राई

ही हिरवी हिरवी राई
अन् वरी अथांग निळाई
ही हिरवी शांती गूढ
एकांत हवासा गाढ

हें असलें बघतां कांहीं
स्मृति तुझी उफाळुन उठते
ही हिरवी हिरवी राई
कणकणांत पुलकित होते

मग एकांताला फुटती
शतवदनें गाया गाणीं
या शांतीमधुनी झरते
स्मरणाची अमृतवाणी

भंगून कोष शांतीचा
स्मृति वाहे कल्लोळांत
अन् अनंत तव प्रतिमांनीं
रंगतो गूढ एकांत

तीं शल्यें हृदयामधलीं
हासरीं मोगरीं होतीं
त्या जखमा दुखऱ्या साऱ्या
नाचऱ्या निर्झरी बनती

मग मी ? मी हिरवी राई
अन् तूं ती शांत निळाई !

# या रस्त्यांतच

या रस्त्यांतच उभ्या उभ्या तूं
बोललास रे, कांहीं ;
ऐकिलेंहि ना, तरि रस्त्याचें
भानच उरलें नाहीं.

निघुनी तूं गेलास आणि मी
घुटमळलें रस्त्यांत ;
वळुनी तूं पाहिलेंस, मिळती
नजरा परस्परांत.

तो रस्ता, तें घुटमळणें, ती
दृष्टिभेट, ते बोल
स्मरतां जातो अजुनहि केव्हां
सभ्य मनाचा तोल !

# येसी वसंत-पाउलीं

येसी वसंत-पाउलीं
फुलवीत कळ्या कळ्या
ग्रीष्मा ! तुझ्या लहरींत
किती पोळल्या गळल्या !

वर्षा ! मेघमल्हारांत
केलें अभ्यंग पावन
पानापानांत सांठलें
धुंद शारद चांदणें

वेड्या हेमंता ! तुझिया—
स्पर्शें झालें मी समृद्ध
रम्य साकारल्या स्वप्नीं
माझी हरपली शुद्ध

येसी शिशिर होउनी
झोडपिसी सारें वन
माझ्या हिरव्या राईचीं
झालीं पिवळीं रे ! पानं

नव्या फुलवाया बागा
पुन्हा होसी साही ऋतु
मशागत साधे तूज
मी न माळीण परंतु

राहूं दे ना ही अशीच
तुवां केली मोडतोड
मला नको रे नकोच
भलतीच तडजोड !

# अचानक उजळीत

अचानक उजळीत   कुंद दिशांना नीरव
घनश्याम आषाढाचा   येइ मत्त पदरव

गंधित त्या चाहुलीनें   तरारलें पानपान
सुरू शहारून उभा   ताठ करुनियां मान

साडी हिरवी राईची   गर्द झाला तिचा रंग
आणि मखमली चोळी   झाली अधिकच तंग

झरा—पदर जरीचा   सावरीतांही ढळला
माड कावराबावरा   मनीं वृथाच लाजला

आणि मलाही वाटलें   आज नेसूं चंद्रकळा
उभा निरखीत मज   वेडा आरसा हासला

आज डोळ्यांच्या डोहांत   स्वप्नें बैसलीं डुंबत
शुभ्र सारस-जोडीचें   कांहीं गुपित ऐकत

आज कितीक दिसांनीं   जुई माळली केशांत
मन भारावून वसे   तिच्या सुगंधकोषांत

परी अज्ञात ओढीनें   पाय पळाले बाहेर
तप्त देहा आलिंगीत   कोसळली जलधार

स्तब्ध झेलीत वर्षाव   अशी होतां ओलीचिंब
थेंबाथेंबांतून धुंद   हासे तुझें प्रतिबिंब

आणि अवचित कसें   कोडें उकले सहज
तुझ्या साक्षात्कारासाठीं   संगतीची ना गरज !



दा. क. 6589

## मन माझें

खळखळत्या लाटांचें
हरित सजल कांठांचें
सोनेरी वाटांचें
मन माझें.

शीतल स्थिर तार्‍यांचें
वासंतिक वार्‍याचें
अतिचंचल पार्‍याचें
मन माझें.

मन माझें सांध्यमेघ
खोल नील जलतडाग
कमलाचा मृदु पराग
मन माझें.

हा श्यामल आडमार्ग
राधेचा प्रणयराग
सीतेची चिर तगमग
मन माझें.

गरुडाच्या पंखांचें
नास्तिक शतशंकांचें
सर्पाच्या डंखांचें
मन माझें.

मुलखाचें हें हटेल
मद्यपीच अन् छटेल
क्षण विटेल क्षण नटेल
मन माझें.

# येतो पाउस

येतो पाउस—
धुंद सुगंधित, मत्त वादळी
स्पर्शुनि जातो उगीच वेडा
कणाकणाला आसुसलेल्या !
अन् उकलित मन-मनचे धागे,
नाजुक-साजुक,
गुप्त चोरटे, स्वप्निल भुरटे
आंत आंत जे लपले होते
कळ्याकळ्यांच्या चोरखणामधिं,
हुसकुनि ज्यांना आज पळविलें
बेहोषीनें असें उधळिलें
या वेड्यानें !
खट्याळ कुठला !

येतो पाउस—
येतो घेउन वास मातिचा उन्मादक
अन् सुरीसारखा तीक्ष्ण दुधारी
पदर फाडितो अंगावरचा झुळझुळणारा
गर्भरेशमी अन् जरतारी
बंद तोडितो काचोळीचे
उघड्या करितो त्या जखमांना
ओठ जयांचे प्राजक्ताच्या देठासम
अन् मृद्गंधासम वास जयांना
जहर शोषिती मम हृदयांतिल
तन्मयतेनें !

—आणि पिणाऱ्या बाळासम मी
ज्यांस लपवितें पदराखालीं
जनदृष्टीच्या वाऱ्यापासुनि संरक्षाया ;
आणिक त्यांनीं जहर शोषितां
कळा थांबती या जीवाच्या,
वाहुं लागतें अमृत केवळ
शिराशिरांतुन अन् शब्दांतुन,
सुटतो भंवतीं सुवास एकच
मम रुधिराचा—छे, मातीचा
सृजनशालिनी !

# करीत लवलव

अनुक्रम ९८९५९
विभाग ...
क्रमांक ९२५८
नों. दि. २५/१२/१४

करीत लवलव
इवल्या निळसर मृदु पंखांची
उघडझांप कीं यौवनचंचल नेत्रदलांची
इंद्रनिळाचा लोलक किंवा गोकर्णीचें फूल चिमुकलें
तरळत जावें जादूनें वर
तसा उडाला पक्षी इवला डोळ्यांपुढुनी
फिकट केशरी आकाशांतुनि
मखमलींत त्या उमटवीत जणुं
नाजुक रेषा संथ गतीची
सहजानंदीं सहज चालला; एकलाच पण !

तोंच खालच्या अथांग हिरव्या शांतीमधुनी
दुजें उडालें स्वप्न निळें,
अन् चालु लागलें पहिल्यासंगत
समांतरें अन् मूकपणें.
नवयुवतीच्या दो गालांवर
दोन आंसवें हळुच गळावीं,
कर्णफुलें कीं इंद्रनिळाचीं
हंसगतीनें हळुच झुलावीं,
लयींत एका लवलव चाले मृदु पंखांची
किंचित् द्रुत अन् आनंदाची
असे उडाले दोघे संगत, करीत सोबत परस्परांची
मूकपणानें.

एकाएकीं
जैसें आलें तसें मिसळलें
तळच्या अपुल्या हिरव्या शांतित स्वप्न निळें तें !

निरोप नाहीं नजरेचाही—शब्द कोठले ?
आणिक पहिलें—
किंचित् थरथर मृदु पंखांची
किंचित् भिरभिर नेत्रदलांची
आणि अनामिक, मूक लाजरी
व्याकुळ हुरहुर, नाजुक निळसर
संथ लयींतच गेली उडुनी माझ्यापुढुनी
पुन्हा एकली—एकलीच ती !

# विरहिणी

आज अवसेची रात
विरहिणी राधेपरी
उभी उदास आतुर
दाट तिमिराच्या तीरीं.

लुकलुकतात तारा
गोड कन्हैयाच्या स्मृति
पुन्हः पुन्हा आठवून
राधा बेहोषली चित्तीं.

दर्या अथांग तमाचा
यमुनाच काळीकाळी
रातराधा प्रेमवेडी
खोल प्रवाहीं शिरली ;

आणि विसरली खुळी
जावयाचें पलिकडे
घरंगळून चाललें
गर्द आकाशी लुगडें.

तपोमग्न गिरिदेहीं
क्षण तरारला कांटा,
आणि ऐकूं ये वाऱ्याचा
क्षीण निःश्वास चोरटा.

धुंद फुंद कालिंदींत
उभी राधा भानहीन
कृष्ण कृष्ण जपतांना
झाली अंतर्बाह्य कृष्ण !

# अजून कांहीं आहे बाकी

रस्त्यावर वा नदीकिनारीं
अवचित किंवा क्षण एकांतीं
परस्परांशीं भिडतां डोळे
नजर अजूनहि होते तिरकी;
—अजून कांहीं आहे बाकी

अजून केव्हां उपचाराचे
शब्द बोलतां चार कोरडे
नकळत निथळे अमृत त्यांतुन
व्यथा उरींची करीत हलकी ;
—अजून कांहीं आहे बाकी.

दाखवितों दोघेंहि उपेक्षा
धरुनि अपेक्षा मनांत दुसरी
उलटावा शर म्हणुनि फेकितों
जखम राखितों झरत सारखी ;
—अजून कांहीं आहे बाकी.

# मी घुसळण घुसळित असतां

मी घुसळण घुसळित असतां
मज आठवतें व्रज तूझें ;
अन् संसारच हा अवघा
होतसे शिरावर ओझें.

मी चाखित असतां बोरें
मज आठवते भिल्लिण ती ;
अन् तुझे निरागस डोळे
जे मुक्याच शपथा घेती.

अंगावर घेतां पाणी
स्मरतो तो वृक्ष कदंब ;
अन् त्यावर बसलेला तूं
मज पाहत ओलीचिंब.

मंचकावरी पडतांना
मज आठवतो तो भुंगा ;
स्मरविद्ध चंद्रसेना ती
अन् तुझा विलक्षण त्रागा.

मी होतां सीता, राधा
हे भास रामकृष्णांचे ;
उरतां मी माझिच आतां
घेशील रूप कोणाचें ?

# करवंदांची ओंजळ

करवंदांची ओंजळ माझ्या करांत टाकून
करवंदांसम नेत्र टपोरे मजवर रोखून
पाहिलेंस क्षण मुखीं घालतां मीं तीं करवंदं
दृष्टिनेंच त्या शोषिलेंस मज अन् चढली धुंद
त्या धुंदींतच जीवन जगलें तुझ्याहिवांचून
धुंद सरे; पण तूंच राहसी मनांत सांचून !

# वाट

क्षितिजाच्या कडेवर
फिरे काजळाचें बोट
लाल-काळ्या अंधारांत
अंधुकशी पायवाट

उभ्या वृक्षवेली शांत
सांवल्यांत गुंतुनियां,
घरट्यास परतली
दूर उडालेली माया

ओढ लागावी घराची
परी लागेना अजून
वाट घोटाळे कोरडी
भिजलेल्या डोळ्यांतून

ओढ लागावी कुणाची
कशी लागेना नकळे ?
डंख मारीत पायांत
वाट मात्र वळवळे !

# त्या तसल्या सायंकाळीं

त्या तसल्या सायंकाळीं—
—ती वेळच तसली—
जी उटी ओलसर मोगरिच्या गंधाची ल्याली
पिउनी वसंतवारा मादक अभिसारास्तव सजली ;
त्या भिजल्या कातरवेळीं
मी नेसुनि वसन अबोली
वासंतिक गौरीचें लावुनि हळदीकुंकू भाळीं
करांत गजरा मोगरिचा अन् हिनागंध भंवतालीं
मी परत जावया वळलें
अन् पाउल माझें खिळलें
दारांत उभा तूं उधळित स्मित मजवरतीं
संध्येपरि नाजुक हळवी पसरित दीप्ती
अन् थांबविसी मज
बोलुनि निरर्थ कांहीं
—निरर्थ तसलें, तें तेव्हांचें, लाडिक ज्यांत बहाणे,
भाव दिवाणे,
तें तसलें हसणें, अन् तसेंच बघणें—
मीही हसलें
विसरुनि हळदीकुंकू
विसरुनि मंगलसूत्र गळ्यांतिल
विसरुनि सारें कांहीं, मीही हसलें
त्या तसल्या सायंकाळीं
—जी तशिच राहणें कातर कंपित
आतुरतेची घेउनि माला करीं चिरंतन
मीलनोत्सुका उभी सदाची
दक्षिणच्या त्या कुमारीपरी !

# अखेर येतें

अखेर येतें तुझ्या मंदिरीं
        जखमी माझें हृदय घेउनी
निज रक्तानें नहात गातें
        आळवितें तुज दिवस-यामिनी

कसा कोठुनी नकळत येउन
        न्याहळसी मज प्रेमदृष्टिनें
अन् रक्ताचीं क्षणांत होती
        लाल सुगंधित गुलाबसुमनें

त्याच सुवासें धुंद होउनी
        सौख्य धुंडितें दारोदारीं
नवी घेउनी जखम उरावर
        पुन्हा यावया तुझ्या मंदिरीं !

# अजून नाहीं

अजून नाहीं, अजून नाहीं
आला का रे, तो सुवर्णक्षण?
वेश्याही घे जाळुनि ज्या क्षणिं
आणि तिलाही हो शिवदर्शन!

चुकचुकलेली पाल ऐकतां
अजून का रे, मन हो व्याकुळ?
हाक तुझी—अन् पुढें उभा तूं
तरि भवतींचें दिसतें गोकुळ!

अजून नच तुटतें रे क्षणही
कमलाचें पंकाशीं नातें;
कमल गंधरसधुंद रहाया
अजून पंकीं जीवन घेतें;

अजून यमुना पाया अडवी
राधा खेळे घरींच होरी!
मीरेला पेल्यांत दिसे विष;
अजून सर्पच दिसते दोरी!

तोच श्याम तूं! तीच बासरी
मीहि तुझी ती—तीच राधिका!
कुठें हरवला, सूर जुळेना
अजून का रे! अजुन असें कां?

# आषाढ

सांग ना सख्या !
ग्रीष्मांतील म्लान कुसुमापरी
शिशिरांतल्या पीत, नीरस, पर्णांच्यापरी
असें का हास्य ?
अशी का दृष्टि ?
अळवावरच्या पाण्यासारखी, कांहीं न स्पर्शीत,
कांहीं न टिपीत, डोळ्याला डोळा देण्याचें टाळीत
अशी का नजर निसरते माझ्या अंगावरून, विषण्ण, खिन्न ?
कशाचा खेद ?

पहा ना जरा
इंद्रधनुष्य सरसावून,
निळ्याजांभळ्या विजेच्या डोळ्यांच्या तीव्र धाकांत
साऱ्या विश्वाला धमकावून, चूप करीत,
नीरव एकान्त निर्मीत आपुल्या मीलनासाठीं
प्रणयी आषाढ आला उत्सुक धरामंदिरीं ;
—माझ्याहि अंतरीं ! नाहीं कळलें ?—
फेकिलें तयानें इंद्रधनुष्य, डोळ्यांतली वीज लाजून कोठें बसे लपून ;
वर्षाव झाला—सहस्र धारांनीं तृप्त झाली धरा !
तूंच तर तो—ओळखिलें नाहीं तुवां स्वरूप,
म्हणूनि हें हास्य, उदास नीरस !
पहा ना जरा—क्षणैक डोळ्याला भिडूं दे डोळा,—
यौवनसुगंधा वसुंधरेचा, सुंदर, शाश्वत उन्माद लेवून,
अंगांगावर मीहि झेलितें तुझ्या दृष्टीच्या संजीवक धारा
पंचप्राणांच्या अंजलीमध्यें !

पहा ना आतां—
आपुल्या दृष्टींत विरून गेलीं शरीरें दोन्ही ;
काळाचीं, जरेचीं तोंडें पडलीं काळीं ठिक्कर !
अजूनीहि आहे—अजूनीहि आहे
तुझ्या नि माझ्या प्रणयामध्यें आषाढ-धरेचें तेंच सामर्थ्य !
प्रीतीच्या त्याच अनावर, भव्य वादळीं, वर्षावीं धुंद व्हायचें,
फुलायचें अन् फुलवायचें अनेक, संतत;
क्षुद्र साऱ्या कक्षा तोडून मोडून,
डबकीं छोटीं, ओहोळ इवले वेंधून, लंघून कडेकपारी,
वाहती आपुल्या प्रीतीचे खळाळ,
साऱ्याच विश्वाला आकळावया ! कवळावया ! फुलवावया !
प्रीतीला का कोठें असतें वय ? शरीर ? कक्षा ?
चिरप्रणयी आषाढ तूं
अन् शाश्वतयौवना धरित्रीच मी !

हास ना सख्या !

# हें शापित वंचित मन

हें शापित वंचित मन माझें
त्या परिघांतच कां घुटमळतें ?
घेउनि स्मृतींचें शिरिं ओझें
ये भोंवळ तोंवर गरगरतें !

त्या गूढ टपोऱ्या डोळ्यांतच
हें अजुनि गुंगतें—नजरेंतच ;
हें अजुनि रंगतें त्या हुकुमी
ओठांच्या हास्या-लास्यांतच ;

त्या अवखळ काळ्या केसांच्या
लाटांतच हें वेडें घुसतें ;
पोलादी दणकट दंडांच्या
घाटांतच रेंगाळत बसतें ;

उल्लंघुनि सीमा स्पर्शाची
जें शब्दांच्या हो पलिकडलें,
त्या दुर्लभ प्रेमांतच बुडतां
गुणगुणतें, "कोडें उलगडलें !"

मी दाखवितें त्या वनराजी
अन् गहनरम्य आकाश निळें
या सागरलहरी मृदु कुरळ्या
हा शशि ज्यांतुनि अमृत निथळे.

मी ऐकवितें त्या गरुडकथा
अन् रामकथाही ऊर्जस्वल ;
मी चेतवितें त्या, टोचुनियां
अंकुश, परि नुचलें हें पाउल !

वरदान कराया शापाचें
किति मार्ग नवे त्या दाखवितें,
आंजारुनि, गोंजारुनि त्यातें
बुझवाया रिझवाया बघतें.

पण हें तर असलें बहु हट्टी
एकुलत्या पोरासम अडतें ;
त्या शापांतच खुलतें फुलतें
दावून वाकुल्या वरि हसतें !

हें शापित वंचित मन माझें...

REFBK-0008341
REFBK-0008341
मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम १०१६८
विभाग
क्रमांक १२८८०
नों. दि. २५/१०/८०
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र.